|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# सोळा सोमवाराची व्रत कहाणी



InstaPDF
INSTAPDF.IN

# सोळा सोमवाराची पूजा विधि

## सोळा सोमवाराची व्रत उद्यापनाचे दोन प्रकार आहेत:

एक प्रकार म्हणजे गुरुजींकडून घरी विधियुक्त पद्धतीने होमात्मक उद्यापन आणि दुसरे म्हणजे मंदिरात जाऊन अभिषेकात्मक उद्यापन. मंदिरात पूजा शक्य नसल्यास गुरुजींना घरी बोलावून रुद्र / लघुरुद्र अभिषेक करू शकता. दर्शनाला व प्रसाद वाटण्यासाठी जवळच्या शिव मंदिरात जावे लागेल.

## सोळा सोमवाराची व्रत पूजा:

संध्याकाळी आंघोळ करावी. पाटावर पूजा मांडावी, धूप,दीप लावावा. पाटाभोवती रांगोळी काढून पाटावर तांदूळ टाकावे, त्यावर घरातील गणपती व महादेवाची पिंड ठेवावी. प्रथम गणेश पूजन करावे, नंतर पिंडीला उमामहेश्वराभ्यां नमः म्हणून पंचामृताचे स्नान घालावे अत्तर लावून, गंध अक्षत, भस्म, फुल, हार, बेल १०८ , वाहून मनोभावे शंकराच्या पिंडीची पूजा करावी. नैवेद्य अर्पण करावा. पूजेत बेलाची पाने अवश्य असावी. देवासमोर बसून “सोळा सोमवार कथा.” ( कहाणी ) वाचावी. “शिवस्तुती” म्हणून नंतर आरती करावी. दर सोमवारी जवळच्या शिव मंदिरात जाऊन एक भाग चूर्म्याचा प्रसाद देवाला अर्पण करावा, दुसरा भाग गाईला खाऊ घालावा व तिसरा भाग घरांतल्या मंडळीस वाटावा व आपण स्वत: घ्यावा.

INSTAPDF.IN

InstaPDF
INSTAPDF.IN

# सोळा सोमवाराची पूजा विधि

## सोळा सोमवाराची व्रत कसे करावे.

- सोळा सोमवार व्रताची सुरवात श्रावणातल्या पहिल्या सोमवारी करावी. १६ सोमवार व्रत करून येणाऱ्या १७व्या सोमवारी व्रताचे उद्यापन करावे. किंवा कोणत्याही महिन्यातल्या शुभ सोमवारी व्रताचे उद्यापन करावे.
- श्रावण महिन्यापरेंत थांबणे शक्य नसल्यास कोणत्याही शुभ नक्षत्रयुक्त सोमवारी आपल्या गुरुजींना विचारून सोळा सोमवार व्रतास प्रारंभ करावा.
- सुरुवातीला शक्य झाल्यास सकाळी संकल्प करण्यासाठी शिवमंदिरात जावे. सलग सोळा सोमवार केलेल्या शंकराच्या व्रतास “सोळा सोमवार” व्रत असे म्हणतात.
- व्रत सुरु करताना सकाळी स्नान करून सोवळें किंवा धूत वस्त्र नेसून, महिलांनी व कुमारिका मुलींनी शक्यतो पांढरी साडी नेसून मनोभावे शंकराची पूजा करावी. दिवसभर उपवास करावा. मनांत शंकराचे स्मरण करावे.

INSTAPDF.IN
InstaPDF
INSTAPDF.IN

# सोळा सोमवाराची कहाणी

आटपाट नगर होतं. त्या नगरांत एक महादेवाचं देऊळ होतं. एके दिवशीं काय झालं? शिवपार्वती फिरतां फिरतां त्या देवळांत आलीं. सारीपाट खेळूं लागलीं. “डाव कोणी जिंकला?” म्हणून पार्वतीनं गुरवाला विचारलं. त्यानं शंकराचं नांव सांगितलं. पार्वतीला राग आला. गुरवाला “तूं कोडी होशील” म्हणून शाप दिला. तशा त्याला असह्य वेदना होऊं लागल्या.

पुढें एके दिवशी काय झालं? देवळीं स्वर्गीच्या अप्सरा आल्या. त्यांनी गुरव कोडी पाहिला. त्याला कारण पुशिलं गुरवानं गिरिजेचा शाप सांगितला. त्या म्हणाल्या, “भिऊं नको. घाबरूं नको. तूं सोळा सोमवारांचं व्रत कर, म्हणजे तुझं कोड जाईल.”

INSTAPDF.IN

गुरव म्हणाला “ तें व्रत कसं करावं?” अप्सरांनीं सांगितलं, “सारा दिवस उपास करावा. संध्याकाळीं आंघोळ करावी. शंकराची पूजा करावी. नंतर अर्धा शेर कणीक घेऊन त्यांत तूप गूळ घालावा व तें खावं. मीठ त्या दिवशीं खाऊं नये. त्याप्रमाणं सोळा सोमवार करावे. सतरावे सोमवारीं पांच शेर कणीक घ्यावी, त्यांत तूप गूळ घालून चूर्मा करावा, तो देवळीं न्यावा. भक्तीनं शंकराची षोडशोपचारे पूजा करावी. नंतर चुर्म्याचा नैवद्य दाखवावा. पुढं त्याचे तीन भाग करावे. एक भाग देवाला द्यावा. दुसरा भाग देवळीं ब्राह्मणांना वांटाचा किंवा गाईला चारावा, तिसरा भाग आपण घरीं घेऊन जाऊन सहकुटुंबी भोजन करावं.” असं सांगून त्या नाहीशा झाल्या.

पुढं गुरवानं तें व्रत केलं, गुरव चांगला झाला. पुढं कांहीं दिवशंनीं शंकरपार्वती पुन्हां त्या देउळीं आलीं. पार्वतीनं गुरवाला कुष्ठरहित पाहिलं. तिनं गुरवाला विचारलं, “तुझं कोड कशानं गेलं?” गुरवानं सांगितलं, “मीं सोळा सोमवारांचं व्रत केलं, त्यानं माझं कोड गेलं” पारवतीला आश्चर्य वाटलं. तिनं आपला रागावून गेलेला मुलगा कार्तिकस्वामी परत यावा म्हणून हें व्रत केलं. समाप्तीनंतर कार्तिकस्वामी लागलीच येऊन भेटला. दोघांना आनंद झाला.

INSTAPDF.IN
InstaPDF
INSTAPDF.IN

त्यानं आईला विचारलं “आई, आई, मी तर तुझ्यावर रागावून गेलों होतों आणि मला पुन्हां तुझ्या भेटीची इच्छा झाली, याचं कारण काय?” पार्वतीनं त्याला सोळा सोमवारच्या व्रताचा महिमा सांगितला. पुढें कार्तिकस्वामीनं तें व्रत केलं. त्याचा एक ब्राह्मण मित्र फार दिवस देशांतराला गेला होता त्याची व ह्याची सहज रस्त्यांत भेट झाली.पुढें कार्तिकस्वामींनं हे व्रत त्या ब्राह्मणाला सांगितलं. त्यानं लग्नाचा हेतु मनांत धरला. मनोभावें सोळा सोमवाराचं व्रत केलं. समाप्तीनंतर तो प्रवासाला निघाला. फिरतां फिरतां एका नगरांत आला.

तिथं काय चमत्कार झाला? तिथल्या राजाच्या मुलीचं लग्न होतं. लग्नाला अनेक देशांचे राजपुत्र आले होते. मंडप चांगले सुशोभित केले आहेत. लग्नाची वेळ झाली आहे. पुढं राजानं हत्तिणीच्या सोंडेंत माळ दिली. माळ ज्याच्या गळ्यांत हत्तीण घालील, त्याला आपली मुलगी द्यायची असा राजाचा पन होता. तिथं आपला हा ब्राह्मण ती मौज पहायला गेला होता. पुढं कर्मधर्मसंयोगानं ती माळ हत्तिणीनं ह्याच ब्राह्मणाच्या गळ्यांत घातली, तशी राजानं आपली मुलगी त्याला दिली. दोघांचं लग्न लावलं व नवरानवरींची बोळावण केली.

INSTAPDF.IN

पुढं काय झालं? राजाची मुलगी मोठी झाली. तशीं दोघं नवराबायको एका दिवशीं खोलींत बसलीं आहेत; तसं बायकोनं नवऱ्याला विचारलं, “कोणत्या पुण्यानं मी आपणांस प्राप्त झालें?” त्यानं तिला सोळा सोमवारांच्या व्रताचा महिमा सांगितला. त्या व्रताची प्रचीती पाहण्याकरितां पुत्रप्राप्तीचा हेतु मनांत धरला व तें व्रत ती करूं लागली. तसा तिला सुंदर मुलगा झाला. तो मोठा झाल्यावर त्यानं आईला विचारलं कीं,“मी कोणत्या पुण्यानं तुला प्राप्त झालीं?” तिनं त्याला व्रताचा महिमा सांगितला. त्यानं राज्यप्राप्तीची इच्छा मनांत धरली. तो व्रत करूं लागला व देशपर्यटनाला निघाला.

इकडे काय चमत्कार झाला? फिरंता फिरंता तो एका नगरांत गेला. त्या राजाला मुलगा नव्हता, एक मुलगी मात्र होती. तेव्हां कोणीतरी एकादा सुंदर व गुणावान असा नवरामुलगा पाहून त्याला आपली मुलगी द्यावी, व राज्यही त्यालाच द्यावं, असा त्यानं विचार केला. अनायासं त्या पुत्राची गांठ पडली. राजानं त्याला पाहिलं. तों राजचिन्हं त्याच्या दृष्टीस पडली. राजानं त्याला आपल्या घरी आणलं. कन्यादान केलं व त्याला आपल्या राज्यावर बसवलं.

INSTAPDF.IN
InstaPDF
INSTAPDF.IN

इतकं होत आहे तों ब्राह्मणाचा सतरावा सोमवार आला. ब्राह्मणपुत्र देऊळीं गेला. घरीं बायकोला निरोप पाठविला की, पांच शेर कणकीचा चुर्मा पाठवून दे. राणीनं आपला थोरपणा मनांत आणला. चुर्म्याला लोक हंसतील, म्हणून एका तबकांत पांचशें रुपये भरून ते पाठवून दिले. चुर्मा वेळेवर आला नाहीं, व्रतभंग झाला म्हणून देवाला राग आला. त्यानं राजाला दृष्टांत दिला. तो काय दिला?

राणीला घरांत ठेवशील तर राज्याला मुकशील. दरिद्रानं पिडशील. असा शाप दिला. पुढं दुसरे दिवशीं ही गोष्ट राजानं प्रधानाला सांगितली. तो म्हणाला. "महाराज, राज्य हें तिच्या बापाचं. आपण असं करू लागलों तर लोक दोष देतील, याकरितां असं करणं अयोग्य आहे." राजा म्हणाला, 'ईश्वराचा दृष्टान्त अमान्य करणं हेंहीं अयोग्य आहे." मग उभयतांनीं विचार केला. तिला नगरांतून हांकून लावलं. पुढं ती दीन झाली. रस्त्यानं जाऊं लागली. जातां जातां एका नगरांत गेली. तिथं एका म्हातारीच्या घरीं उतरली. तिनं तिला ठेवून घेतलं, खाऊंपिऊं घातलं.

INSTAPDF.IN

InstaPDF
INSTAPDF.IN

पुढं काय झालं? एके दिवशीं म्हातारींनं तिला चिवटं विकायला पाठवलं. दैवाची गति विचित्र आहे! बाजारांत ती चालली. मोठा वारा आला, सर्व चिवटं उडून गेलीं. तिनं घरीं येऊन म्हातारीला सांगितलं. तिनं तिला घरांतून हांकलून लावलं. तिथून निघाली तों एका तेल्याच्या घरीं गेली, तिथे तेलाच्या घागरी भरल्या होत्या, त्यांजवर तिची नजर गेली. तसं त्यातलं सगळं तेल नाहीसं झालं. म्हणून तेल्यानं तिला घालवून दिलं. पुढं तिथून निघाली. वाटेनं जाऊं लागली.

जातां जातां एक नदी लागली. त्या दिवशी नदीला पाणी पुष्कळ होतं. पण तिची दृष्टी त्याजवर गेल्याबरोबर सर्व पाणी आटून गेलं. पुढं जातां जातां एक सुंदर तळं लागलं. त्याजवर तिची दृष्टी गेली, तसे पाण्यांत किडे पडले. पाणी नासून गेलं. रोजच्यासारखे तळ्यावर गुराखी आले. नासकं पाणी पाहून मागं परतले. गुरंढोरं तान्हेलीं राहिली.

पुढं काय झालं? तिथं एक गोसावी आला. त्यानं तिला पाहिलं. कोण कुठची म्हणून सगळी हकीकत विचारली. तिनं सगळी हकीकत सांगितली. गोसाव्यानं तिला धर्मकन्या मानलं व आपले घरीं घेऊन आला. तिथं राहून ती कामधंदा करूं लागली.

INSTAPDF.IN
InstaPDF
INSTAPDF.IN

तशी जिकडे तिकडे तिची दृष्टी जाऊं लागली. ज्यांत तिची दृष्टी जाई त्यांत किडे पडावे, कांहीं जिनसा आपोआप नाहींशा व्हाव्या, असा चमत्कार होऊं लागला.

मग गोसाव्यानं विचार केला. अंतर्दृष्टि लावली. तिच्या पदरीं व्रत मोडल्याचं पाप आहे असं त्यानं जाणलं. तें नाहीसं केल्याशिवाय तिची दृष्टी चांगलीं होणार नाहीं असं ठरवलं. मग त्यानं शंकराची प्रार्थना केली. देव प्रसन्न झाले. गोसाव्यानं राणीबद्दल प्रार्थना केली. शंकरानं तिला सोळा सोमवाराचं व्रत करायला सांगितलं व आपण अंतर्धान पावले. पुढं गोसाव्यानं तिच्याकडून सोळा सोमवाराचं व्रत करविलं, तसा परमेश्वराचा कोप नाहींसा झाला.

तिच्या नवऱ्याला तिच्या भेटीची इच्छा उद्भवली, दूत चोहीकडे शोधाला पाठवले. शोधतां शोधतां तिथं आले. गोसाव्याच्या मठींत राणीला पाहिलं. तसंच जाऊन त्यांनी सांगितलं. त्याला मोठा आनंद झाला. राजा प्रधानासुद्धा गोसाव्याकडे आला.

INSTAPDF.IN
InstaPDF
INSTAPDF.IN

गोसाव्याला साष्टांग नमस्कार केला. वस्त्रप्रावर्ण देऊन संतोषित केलं. गोसावी म्हणाला, “राजा राजा, ही माझी धर्मकन्या. मी इतके दिवस तिला माहेरी ठेवूनीं घेतलं होतं, ती तुझी स्त्री आपले घरीं घेऊन जा व चांगल्या रीतीनं पाणिग्रहण करून सुखानं नांद.”राजानं होय म्हटलं. गोसाव्याला जोड्यानं नमस्कार केला व राणीला घेवून आपल्या नगरीं आला. पुढं मोठा उत्सव केला. दानदक्षिणा देऊन ब्राह्मण संतुष्ट केले. राजाराणींची भेट झाली. आनंदानं रामराज्य करूं लागली.

तसे तुम्ही शंकराला प्रसन्न करून रामराज्य करा. ही साठां उत्तरांची कहाणी पांचा उत्तरीं, देवाब्राह्मणांचे द्वारीं, गाईचे गोठींत, पिंपळाचे पारीं सुफळ संपूर्ण.

INSTAPDF.IN

InstaPDF
INSTAPDF.IN

# सोळा सोमवाराची व्रत उद्यापन पूजेचे साहित्य

- हळद, कुंकू, गुलाल, अक्षता, अबीर, भस्म, पंचामृत, दुध ५०० ग्राम, फुले, चंदनाचे गंध, अत्तर, जानवे, पांढरे वस्त्र, पीस, ओटीचे समान, सुट्टी नाणी, धूप, दीप, नैवेद्य, कापूर, सुपारी, विड्याची पाने, फळ, बेलाची पाने १०८ , बेलफळ, नारळ २.
- शंकराच्या देवळात जाऊन मनोभावे शंकराची षोडशोपचारे पूजा करावी. १०८ किंवा १ हजार बिल्वपत्रे वहावी. नैवेद्य दाखवुन आरती करावी. मनांतल्यामनांत आपली इच्छा सांगून इच्छा पूर्ण करण्याविषयी प्रार्थना करावी.
- चूर्म्याचे तीन भाग करून एक भाग मंदिरात देवाला, ब्राह्मणांना व मंदिरातील भक्तांना वाटावा दुसरा भाग गाईला चारावा आणि तिसरा भाग घरी आणून कुटंबातल्या सर्व मंडळींनी व स्वत: घ्यावा.
- शंकराचे देऊळ जवळपास नसल्यास किंवा देवळात जाणे शक्य नसल्यास, घरीच ब्राह्मणास बोलावून श्रीशंकराची षोडशोपचार पूजा करावी. देवळात करावयाच्या म्हणून सांगितलेल्या सर्व गोष्टी कराव्या.
- उद्यापनाच्या दिवशी सुद्धा मागील १६ सोमवारांप्रमाणे "सोळा सोमवार कथा" वाचावी. "शिवस्तुती" म्हणून आरती करावी. चूर्म्याचा प्रसाद सर्वांना वाटावा, आपण जेवतांना प्रसाद घ्यावा. कुटुंबातल्या सर्वांनी भोजन करावे.
- मनोभावे व निष्ठापूर्वक व्रत करणाऱ्याच्या सर्व ईच्छा भगवान शिवशंकर पूर्ण करतात असा आतापर्यंतचा अनुभव आहे.

INSTAPDF.IN
InstaPDF
INSTAPDF.IN

INSTAPDF.IN

Hi! We're InstaPDF. A dedicated portal where one can download any kind of PDF files for free, **with just a single click**.

https://instapdf.in

READ DISCLAIMER

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

YouTube: hariom astrologers
Facebook: hariom astrologers
Instagram: hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com